# फार्मसी विद्यार्थ्यांसाठी आयटी हेल्थकेअर क्षेत्रातील संधींवर मार्गदर्शक सेमिनार




**जयसिंगपूर (प्रतिनिधी) :**

फार्मसी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना बदलत्या आयटी-हेल्थकेअर उद्योगातील करिअर संधींबाबत मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने डॉ. जे. जे. मगदुम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर आणि रेस प्रशिक्षण आणि प्लेसमेंट संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात एकदिवसीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

फार्मा पदवीधरांसाठी सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या आयटी आरोग्यसेवा क्षेत्रातील नोकऱ्या या विषयावर आयोजित या सेमिनारमध्ये मेडिकल कोडिंग आणि बिलिंग, क्लिनिकल रिसर्च, फार्माकोव्हिजिलन्स आणि क्लिनिकल डेटा मॅनेजमेंट या क्षेत्रांतील करिअर संधींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या सेमिनारसाठी रेस प्रशिक्षणचे संचालक आणि सह-संस्थापक तसेच फार्मा व मेडिकल शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शक श्री. मेहेर तुंडुळवार प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आयटी-हेल्थकेअर क्षेत्रातील सध्याची मागणी, आवश्यक कौशल्ये, करिअरची दिशा तसेच रोजगाराच्या संधी याबाबत सखोल माहिती दिली. तसेच क्लिनिकल ऑपरेशन्स क्षेत्रातील तज्ज्ञ श्री. मयूर गडकरी यांनी आपल्या अनुभवातून उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाजाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शितलकुमार एस. पाटील यांनी फार्मसी शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख आणि आधुनिक करिअर संधींची ओळख करून देणे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांना उज्ज्वल करिअर घडवता येईल, असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाला संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम, व्हाईस चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम यांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात महाविद्यालयाचे प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी विनोद पाटील यांचे मोलाचे योगदान लाभले. तसेच शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. सेमिनारच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या शंका-समाधान सत्रात मोठ्या प्रमाणावर प्रश्नोत्तरे झाली.